**फौजदारी खटल्यात माहितीचा अधिकार: गुन्ह्याची प्रथम खबर, पोलिसांकडील फिर्याद आणि दोषारोपत्र**

**१. गुन्ह्याच्या प्रथम खबरीची माहिती मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज**

गुन्ह्यांच्या प्रथम खबरी, पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादी आणि दोषारोपपत्रे यांच्या प्रती मिळवण्यासाठी माहितीचा अधिकार कसा उपयुक्त ठरू शकतो याबाबत वाचकांना माहिती देण्याचा प्रयत्न या नमुन्याद्वारे करण्यात येत आहे. जोवर माहितीचा अधिकार कायदा अस्तीत्वात नव्हता तोवर लोकांना उपलब्ध नसलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणांकडून मिळवण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नागरिकांना कसा उपयुक्त ठरला आहे, त्याचा वापर करून कागदपत्रे आणि दस्तऐवजांच्या प्रती कशा मिळवता येतात, याबाबतची माहिती आता साऱ्यांना उपलब्ध आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम पारित करण्यामागे माहिती मिळण्यास सहाय्य करणे आणि सार्वजनिक प्राधिकरणांची त्यांच्या कृतींसाठीची जबाबदारी निश्चित करणे हे उद्देश होते. त्यामुळेच माहितीच्या अधिकारामुळे सार्वजनिक प्राधिकरणांच्या कार्यामध्ये पारदर्शकता आली असे ठामपणे सांगता येते.

जेथवर गुन्ह्यांच्या प्रथम खबरी, पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादी आणि दोषारोपपत्रे यांच्या प्रती मिळवण्याचा संबंध आहे तेथवर, **गुन्ह्यांच्या प्रथम खबरी, पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादी आणि दोषारोपपत्रे यांच्या प्रती माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करून मिळवता येतील असे विविध न्यायाधिकरणांनी ग्राह्य धरलेले आहे.**

गुन्ह्यांच्या प्रथम खबरींना मूलभूत पुरावा म्हणून महत्व असल्याने त्यांच्या प्रती मिळवण्याकडे अर्जदारांचा कल असतो असे आढळून आलेले आहे. गुन्ह्याच्या प्रथम खबरीचा, जिला प्रथम खबर असेही संबोधले जाते, समावेश माहितीचा अधिकार अधिनियमानुसार माहिती समजले जाते कारण गुन्ह्याच्या कृत्याची नोंद करणारा तो पहिला दस्तऐवज असतो आणि असा दस्तऐवज बनतो त्या क्षणीच पोलिसांना अशा एखादा गुन्हा घडला आहे या तथ्याची माहिती मिळते. गुन्ह्याच्या प्रथम खबरीमध्ये गुन्ह्यास बळी पडलेली व्यक्ति, आरोपी आणि साक्षीदार यांच्याबाबत महत्वाची माहिती असल्यामुळे माहिती आयुक्त श्री वजाहत हबिबुल्ला आणि श्री शैलेश गांधी यांचा समावेश असलेल्या मा केंद्रीय माहिती आयोगाच्या खंडपीठाने श्री प्रशांत भूषण विरुद्ध पोलिस उपायुक्त, गुन्हे आणि रेल्वे या प्रकरणात असा निर्णय दिला की गुन्ह्याची प्रथम खबर तिला पृथकतेची तरतूद लागू करून, म्हणजेच ८(१)(ज) आणि ८(१)(छ) ही माहिती प्रकट करण्याबाबतच्या अपवादांची कलमे तिच्या संदर्भात नियमबाहय ठरवून (गैरलागू करून) देता येईल.

मा केंद्रीय माहिती आयोगाने श्री न्यायमूर्ती आर एन मिश्रा (निवृत्त) विरुद्ध सीबीआय या प्रकरणात असेही ग्राह्य धरले आहे की प्रत्येक नागरिकास, त्यात एखाद्या आरोपीचाही समावेश होईल, या अधिनियमाच्या अन्वये गुन्ह्याच्या प्रथम खबरीची प्रत मागण्याचा अधिकार आहे. केवळ अशा प्रकरणात आरोपी हाच अर्जदार आहे या आधारे अर्ज फेटाळणे ही स्वेच्छानुसारी कारवाई ठरेल.

जिजू लुकोसे विरुद्ध केरळ सरकार या प्रकरणात मा केरळ उच्च न्यायालयाने ग्राह्य धरले आहे की दोन दिवसात गुन्ह्याच्या प्रथम खबरीची प्रत पुरवणे हे संबंधित पोलिस ठाणे किंवा पोलिस अधिक्षकांचे कार्य आहे.

मा सर्वोच्च न्यायालयाने युथ बार असोसिएशन ऑफ इंडिया विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात दिनांक ०७.०९.२०१६ रोजी दिलेल्या निकालात संवेदनशीलता, नेटवर्क कनेक्टीव्हिटी इत्यादीबाबतच्या निर्देशांचे पालन करून स्वत:च्या जबाबदारीवर वेबसाइटवर प्रथम खबरींच्या प्रती अपलोड करण्याच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना केल्या. यामागे पक्षांना आणि त्यांच्या नातेवाईकांना प्रथम खबरी सहजपणे मिळवण्यास सहाय्य करणे असा न्यायालयाचा उद्देश होता.

मा दिल्ली उच्च न्यायालयाने देखील ड्ब्ल्युपी(सीआरएल) क्र ४६८/२०१० या प्रकरणात संबंधित राज्यांच्या पोलिस खात्यांना प्रथम खबरी ऑनलाइन अपलोड करण्याबाबत मार्गदर्शक सूचना केल्या होत्या.

महाराष्ट्र माहिती आयोगाने पोलिस महासंचालकांना सर्व प्रथम खबरींच्या प्रती सहज मिळण्यासाठी वेबसाइटवर अपलोड करण्याचे निर्देश दिले होते. महाराष्ट्र राज्यात नोंदवलेल्या प्रथम खबरींच्या प्रती येथे मिळवता येतील.

पंजाब राज्यात प्रथम खबरीची प्रत मिळवण्यासाठी पंजाब राज्य पोलिस खात्याने सन २०१६ मध्ये प्रथम खबरींच्या आणि जनरल डायरी अभिलेखाच्या प्रती माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून पुरवण्याचे निर्देश जारी केले. कोणत्याही प्रथम खबरीची प्रत, ती 'गोपनीय कागदपत्र' या व्याख्येतच्या कक्षेत बसत नसल्यास, अर्जदाराला द्यावी असे त्यात म्हणले आहे. या कक्षेत काय येते हे ठरवण्याचे अधिकार केवळ जन माहिती अधिकाऱ्याला देण्यात आलेले आहेत. तथापि, ज्यात गुन्ह्यास बळी पडलेल्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवणे अनिवार्य आहे अशा काही विशिष्ट वर्गातील गुन्ह्यांच्या प्रथम खबरीच्या प्रती पुरवणे उपरोक्त प्रतींमधून वगळण्यात आलेल्या आहेत. यामध्ये प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्युअल ऑफेंसेस ॲक्ट (पोस्को कायदा), अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज प्रिव्हेंशन ॲक्ट (यूएपीए कायदा) आणि ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट (गोपनीयतेचा कायदा) यांच्या अन्वये नोंदवलेल्या गुन्ह्यांचा समावेश आहे. तसेच, धार्मिक तणाव, दहशतवादी कारवाया, राष्ट्रीय सुरक्षितता, आणि ज्यात मुलांचा सहभाग आहे अशा ज्युव्हेनाईल जस्टीस ॲक्ट (बाल न्याय अधिनियम) खाली नोंदवलेले गुन्हे देखील प्रती पुरवण्यापासून वगळण्यात आलेले आहेत.

वाचकांच्या सोयीसाठी भारतीय दंड संहितेच्या (इंडियन पिनल कोड) कोणत्या कलमांखाली नोंदवलेले गुन्हे प्रथम खबरीच्या प्रती पुरवण्यातून वगळण्यात आलेले आहेत यासंदर्भातील सविस्तर कोष्टक खाली दिलेले आहे:-

| अनु. क्र. | कलम | शीर्षक |
|---|---|---|
| १ | ३७६ | बलात्काराबद्दल शिक्षा |
| २ | ३७६ अ | बलात्कार करताना स्त्रीच्या मृत्यूस कारणीभूत होणे, किंवा तिला कायमची पंगु करणे |
| ३ | ३७६ ब | फारकतीच्या काळात पतीने पत्नीशी केलेला संभोग |

| | | |
|---|---|---|
| ४ | ३७६ क | प्राधिकारी असलेल्या व्यक्तीने केलेला संभोग |
| ५ | ३७६ ड | सामूहिक बलात्कार |
| ६ | ३७६ ई | वारंवार गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा |
| ७ | ३७७ | अनैसर्गिक अपराध |

*या निर्णय आणि कृतींवरून सिद्ध होते की प्रथम खबरींच्या प्रती माहितीच्या अधिकाराखाली मागता येतात.*

न्यायमंडळ आणि अर्धन्यायिक संस्था, म्हणजेच या संदर्भात माहिती आयोग, यांनी विस्तृत अर्थाच्या संदर्भात कायद्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेल आहे. त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाचे सार शक्य तेवढ्या अचूकपणे लागू करण्याचाही प्रयत्न केला आहे.

**२. दोषारोपपत्राची प्रत मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (क्रिमिनल प्रोसीजर कोड) कलम १७३ नुसार दोषारोपपत्र हा पोलिसांनी तपास पूर्ण केल्यानंतर सादर केलेला दस्तऐवज असतो.

माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करून दोषारोपपत्राची प्रत मिळवणे कोठवर शक्य आहे याचे विश्लेषण आपण खालील बिंदूंच्या सहाय्याने करू:-

- दोषारोपपत्र हा सार्वजनिक दस्तऐवज आहे असे केंद्रीय माहिती आयोगाने ग्राह्य धरले आहे. यासाठी आधारभूत तर्क असा आहे की प्रथम खबर, सुनावणी आणि निकाल सार्वजनिक असल्याने फौजदारी न्याय प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी दोषारोपत्र देखील सार्वजनिक करणे आवश्यक आहे. हे व्ही जे थॉमस विरुद्ध केरळ सरकार या प्रकरणात मा केरळ उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर आधारित आहे.
- उषा कांत असीवाल विरुद्ध दक्षता संचालनालय (डायरेक्टरेट ऑफ व्हिजिलन्स) या प्रकरणात असे ग्राह्य धरले की, ज्याला फौजदारी सुनावणीत रस आहे अशा कोणत्याही व्यक्तीस भारतीय पुराव्याचा अधिनियम या कायद्याच्या कलम ७६ नुसार पाहणी करण्याचा अधिकार आहे.
- कलम ८(१)(ज) च्या संरक्षणाखाली जन माहिती अधिकाऱ्यांचा कल माहिती नाकरण्याकडे असतो असे अनेकदा आढळून आलेले आहे. ही प्रथा मोडून काढण्यासाठी, मुख्य माहिती आयुक्त श्री शैलेश गांधी यांनी कलम ८(१)(ज) उधृत करत घेतलेला आक्षेप फेटाळून दोषारोपपत्राच्या प्रकटीकरणाचे आदेश दिले. त्यांनी ग्राह्य धरले की:-

*“माहितीचा अधिकार अधिनियमानुसार, कलम ८ अन्वये केलेले अपवाद वगळता सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली कोणतीही माहिती मिळवण्याचा अधिकार नागरिकांना आहे. दोषारोपपत्रात न्यायालयापुढे सादर करणे आवश्यक असलेला पुरावा असल्याने त्याद्वारे अनेक व्यक्तीगत किंवा खासगी किंवा गोपनीय तपशील उघड होण्याची शक्यता आहे. कॉल डाटाद्वारे आरोप सिद्ध करणे आवश्यक असल्यास, ज्यात आरोपाशी संबंधित नसलेल्या कॉल्सचे तपशील निश्चितच असतात अशा कॉल डाटाचा संदर्भ दोषारोपपत्रात दिला जातो. ही जिचे संरक्षण करणे आवश्यक आहे अशी खासगी माहिती असू शकते. त्यामुळे प्रत्येक दोषारोपपत्र स्वतंत्रपणे तपासून आणि अनावश्यक आणि पुराव्याशी*

*संबंध नसलेले तपशील वेगळे काढून, आणि दोषारोपत्रातील केवळ आवश्यक ती आणि परवानगी देण्यायोग्य माहिती पुरवण्यात यावी. अशा प्रकारे, दोषारोपपत्रास सरसकट प्रकटीकरणापासून रोखता येणार नाही, किंवा त्याचे सरसकट प्रकटीकरणही करता येणार नाही. दोषारोपपत्र हा दस्तऐवज ज्या प्राधिकरणाने त्याच्या प्रकटीकरणाची बाब माहितीचा अधिकार अधींनियमाच्या कलम ८ आणि ९ नुसार तपासायची आहे आणि प्रकरणात निर्णय घ्यायचा आहे अशा संबंधित प्राधिकरणाकडे असतो."*

## ३. फिर्यादीची प्रत मागवण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (क्रिमिनल प्रोसीजर कोड) कलम २(घ) मध्ये 'फिर्याद' या संज्ञेची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे:-

*"फिर्याद" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने – मग ती ज्ञात असो व अज्ञात असो, - अपराध केला आहे अशा आशयाचे दंडाधिकाऱ्याकडे, त्याने या संहितेखाली कारवाई करावी या हेतूने करण्यात आलेले कोणतेही तोंडी किंवा लेखी अभिकाठण असा आहे, पण यात पोलिस अहवालाचा समावेश नाही"*

सामान्यता, पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादीमध्ये पुढील आवश्यक घटकांचा समावेश असतो:-

- पोलिसांकडे नोंदवलेली फिर्याद हा एखाद्या गुन्ह्याच्या कृत्याबाबत पोलिसांना दिलेला प्राथमिक अहवाल असतो.
- ती गुन्ह्याच्या पहिल्या खबरीसाठीची पूर्वावश्यकता असते.
- तिच्यात केवळ गुन्ह्याशि सबंधित तथ्ये/ घटनांचे कथन असते.
- ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा घडला आहे त्या पोलिस ठाण्यात ती दाखल असणे आवश्यक असते.
- ती ऑनलाईन किंवा ऑफलाईन दाखल करता येते.

श्री राहुल कुमार गोयल विरुद्ध दिल्ली पोलिस या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने असे ग्राह्य धरले की, पोलिस खात्याच्या जन माहिती अधिकाऱ्याने पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादींच्या संदर्भात माहिती देणे आवश्यक आहे. फिर्यादीची प्रत देणे हे जन माहिती अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. फिर्यादीची प्रत खात्याकडून हरवलेली असल्यास, जन माहिती अधिकाऱ्याने त्यासंदर्भात उचललेल्या पावलांबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

कौटुंबिक वादाबाबत पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या फिर्यादीच्या संदर्भात, अशा फिर्यादीची प्रत दोन्हीपैकी कोणत्याही पक्षास मागता येते. श्री व्ही अय्यप्पन विरुद्ध पाँडिचेरी येथील पोलिस ठाण्यातील पाँडिचेरी केंद्रशासित प्रदेश प्रशासन या प्रकरणात अर्जदाराने त्याच्या पटणीबाबत कोणतीही व्यक्तीगत माहिती मागितली नव्हती, तर केवळ त्याच्याविरोधातील आरोपांचा तपशील जिच्यात आहे अशा फिर्यादीची प्रत मागितली होती या आधारे केंद्रीय माहिती आयोगाने हा निर्णय दिला.

*त्यामुळे, माहिती अधिकार अधिनियमाच्या अन्वये पोलिसांकडे नोंदवलेल्या फिर्यादीची प्रत मिळवता येते हे प्रस्थापित झाले आहे.*

**४. युक्त्या आणि क्ल्युप्त्या**

माहिती अर्ज सादर करताना खालील मुद्दे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे:-

- प्रथम खबर, दोषारोपपत्र किंवा फिर्यादीची प्रत मागण्यासाठी अर्ज करताना शक्य तेवढे जास्त तपशील द्यावेत.
- फौजदारी प्रकरणातील एखाद्या पक्षाशी तुमचे नातेसंबंध असल्यास तुमचे नाते नमूद करा. त्यामुळे तृतीयपक्ष म्हणून अर्ज फेटाळला जाण्याची शक्यता कमी होण्यास मदत होऊ शकते.
- माहिती तातडीने हवी असल्यास, प्रकरणातील पक्षाच्या जीवित आणि स्वातंत्र्यावर होणारा परिणाम दर्शवा. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यावर अर्ज दाखल केल्यापासून ४८ तासात माहिती पुरवण्याचे बंधन येईल.
- शक्य असल्यास, तपास पूर्ण होईपर्यंत थांबा. असे केल्याने प्रकरणात तपास सुरू आहे या आधारावर अर्ज फेटाळला जाण्याची शक्यता राहणार नाही.

*<u>नमूना अर्ज</u>*

ऑक्टोबर २०, २०२०

प्रति,

जन माहिती अधिकारी,
पोलिस नियंत्रण कक्ष, शिवपुरी
शिवपुरी, मध्यप्रदेश
पिनकोड:- ४७३५५१

<u>विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम कलम ६(१) अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज</u>

महोदय/ महोदया,

दिनांक २०.०९.२०२० रोजी माझी पत्नी सौ यक्षज्ञ जैन यांनी या पोलिस ठाण्यात एक फिर्याद नोंदवलेली आहे. कृपया उपरोक्त संदर्भात मला पुढील कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात:-

गुन्ह्याची प्रथम खबर नोंदवण्यासाठी त्यांनी सादर केलेल्या लेखी तक्रारीची प्रत;
माझ्या पत्नीने दिनांक २०.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या पहिल्या खबरीची प्रत;
पोलिसांनी नोंदवलेल्या फिर्यादीची प्रत, असल्यास;
पोलिसांनी तयार केलेल्या दोषारोपपत्राची प्रत; असल्यास

कृपया ही माहिती माझ्या खाली दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने किंवा स्पीड पोस्टाने पाठवावी.

आपला,

सही
श्री अबक जैन
घर क्र. ०१, पी/क्यू कॉलनी, शिवपुरी
पिनकोड:- ४७३५५१

| **अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया याची दखल घ्यावी** |
|---|
| १. आवश्यक असल्यास, कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास रास्त मदत करावी. |
| २. माहिती पुर्णत: किंवा अंशत: अन्य विशिष्ठ खात्याकडे उपलब्ध असल्यास कलम ६(३) अन्वये केलेल्या तरतुदीनुसार कृपया अर्ज संबंधित खात्याकडे पूर्णत: किंवा अंशत: अंतरीत करावा. |